पुढारी

# राज्यपाल भगतसिंह कोश्यारी मंगळवारी कोल्हापूर दौऱ्यावर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे मंगळवारी (दि. ५) कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. सकाळी १०.१५ वाजता कोल्हापूर विमानतळ येथे त्यांचे आगमन होईल. त्यानंतर महासैनिक दरबार हॉल येथे आयोजित पहिले विश्वात्मक संत साहित्य संमेलनाचे त्यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

या कार्यक्रमानंतर ते शिवाजी विद्यापीठातील शाहू हॉल येथे आयोजित प्रेसिडेंट व चान्सलर अ‍ॅवॉर्ड कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. दुपारी १ वाजता ते विमानाने मुंबईला रवाना होणार आहेत.

तरुण भारत



# समाजोपयोगी संशोधनाकडे लक्ष द्या

**कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन**

**कोल्हापूर :** विद्यापीठातील संशोधकांनी अधिकाधिक समाजोपयोगी संशोधनाकडे लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागाने युजीसी स्ट्राईड कार्यक्रमांतर्गत 'मॉलिक्युलर टेक्निक्स इन बायोलॉजिकल रिसर्च' या विषयावरील कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचे मूलभूत संशोधनाच्या क्षेत्रात मोठे नाव आहे. विज्ञान, सामाजिक विज्ञान अशा सर्वच विद्याशाखांत संशोधनाचे कार्य गतीने सुरू आहे. तरीही आता सामाजिक उपयोजनाच्या दृष्टीकोनाची संशोधनकार्याशी सांगड घालण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्या दृष्टीने विद्यापीठीय संशोधकांनी आपले संशोधन केंद्रित करणे आवश्यक आहे. अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांनी प्राणिशास्त्र विषयातील संशोधकांनी इतर विषयांशी सांगड घातली, तर संशोधनाच्या आणखी किती तरी दिशा लाभतील, असे सांगितले. कार्यशाळेत पुणे येथील सीएसआयआर–एनसीएलचे गोपाळ कल्तुरे यांनी 'पीसीआर व ॲग्रोस जेल इलेक्ट्रोफोरेसीस, शारदा मोहिते यांनी 'एसडीएस–पेज' या विषयावर संजय घोडावत विद्यापीठातील डॉ. अभिनंदन पाटील यांनी 'प्रॉब सोनिकेटर व ल्योफिलायझर''विषयावर, डॉ. ए. ए. देशमुख यांनी 'आयडेन्टीफिकेशन ऑफ प्रोटीन लोकॅलायझेशन बाय इम्युनोसायटोकेमिस्ट्री' या विषयावर, बेंगलोर येथील लॉरेन्स ॲन्ड मेयो इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे वरिष्ठ संशोधक पद्मनाभन रवी यांनी 'प्रिन्सिपल ऑफ लाइट ॲन्ड डार्क फिल्ड मायक्रोस्कोपी' या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेत ३५ संशोधकांनी सहभाग नोंदविला. या कार्यशाळेचे आयोजन प्राणिशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. ए. ए. देशमुख व डॉ. एम. व्ही. वाळवेकर यांनी केले.

पुढारी

# समाजोपयोगी संशोधनाकडे लक्ष केंद्रित करण्याची गरज : कुलगुरू शिर्के

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**


विद्यापीठातील संशोधकांनी अधिकाधिक समाजोपयोगी संशोधनाकडे लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के यांनी केले. विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र, अधिविभागात यूजीसी स्ट्राईड कार्यक्रमांतर्गत 'मॉलिक्युलर टेक्निक्स इन बायोलॉजिकल रिसर्च' या विषयावर कार्यशाळा झाली. समारोपप्रसंगी ते बोलत होते.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यशाळेत सीएसआयआर-एनसीएल, पुणे येथील गोपाळ कल्लुरे यांनी 'पीसीआर व ॲग्रोस जेल इलेक्ट्रोफोरेसिस' या विषयावर व्याख्यान दिले. शारदा मोहिते यांनी 'एसडीएस-पेज' या विषयावरील प्रात्यक्षिक दाखविले. डॉ. अभिनंदन पाटील यांनी 'प्रॉब सोनिकेटर व ल्योफिलायझर' विषयी व्याख्यान दिले. कार्यशाळेचे आयोजन डॉ. ए. ए. देशमुख, डॉ. एम. व्ही. वाळवेकर यांनी केले.

लोकमत

# 'राज्यशास्त्र'च्या विभागप्रमुखपदी पवार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील



राज्यशास्त्र अधिविभाग-प्रमुखपदी प्रा. डॉ. प्रकाश रामचंद्र पवार यांची शुक्रवारी नियुक्ती झाली आहे. त्यांच्या विभागप्रमुखपदाचा कालावधी तीन वर्षे असणार आहे. प्रा. पवार गेल्या नऊ वर्षांपासून राज्यशास्त्र विभागात कार्यरत आहेत. गेल्या तीन वर्षांपूर्वी त्यांनी या विभागप्रमुखपदाची जबाबदारी सांभाळली होती. सध्या ते विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या प्रभारी संचालकपदी कार्यरत आहेत. विद्यापीठात रूजू होण्यापूर्वी त्यांनी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या प्रा. आर. एम. महाविद्यालय आणि अण्णासाहेब मगर महाविद्यालय येथे अध्यापन केले आहे. राजकीय विश्लेषक आणि लेखक म्हणूनही त्यांची ओळख आहे.

सकाळ

# प्रा. डॉ. प्रकाश पवार यांची नियुक्ती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुखपदी प्रा. डॉ. प्रकाश रामचंद्र पवार यांची नियुक्ती झाली. त्यांच्याकडे यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या प्रभारी संचालकपदाचा कार्यभार आहे. ते नऊ वर्षांपासून राज्यशास्त्र विभागात अध्यापनाचे काम करत आहेत. तीन वर्षे ते विभाग प्रमुख म्हणून काम पाहतील. यापूर्वी ते पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या प्रा. आर. एम. महाविद्यालय व अण्णासाहेब मगर महाविद्यालयात कार्यरत होते.

02 APR 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाकडून २७८ महाविद्यालयांचे ऑडिट

## शिक्षणक्षेत्रातील स्थान समजणार : कोल्हापूर, सातारा, सांगलीत प्रक्रिया सुरू

संतोष मिठारी
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाने कोल्हापूर, सांगली, सातारामधील संलग्नित २७८ महाविद्यालयांच्या विद्याविषयक लेखापरीक्षणाची प्रक्रिया सुरू केली आहे. त्यातून संबंधित महाविद्यालयांना त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील स्थान समजणार आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमात विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांचे विद्याविषयक लेखापरीक्षणाची तरतूद आहे. 'नॅक' मूल्यांकनात महाविद्यालयांनी लेखापरीक्षण करून घेणे बंधनकारक होते. खासगी संस्थांकडून महाविद्यालये परीक्षण करून घेत होते. मात्र, विद्यापीठ अधिनियमातील तरतुदीनुसार शिवाजी विद्यापीठाने महाविद्यालयांच्या लेखापरीक्षणाची प्रक्रिया गेल्यावर्षी नोव्हेंबरपासून सुरू केली. याअंतर्गत आतापर्यंत एकूण ७० महाविद्यालयांचे परीक्षण पूर्ण झाले आहेत. त्यात कोल्हापुरातील ३०, सांगलीतील १९, तर साताऱ्यातील २१ महाविद्यालयांचा समावेश आहे. उर्वरित महाविद्यालयांचे परीक्षण मे अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन विद्यापीठाने केले आहे.

### परीक्षणाची प्रक्रिया अशी

भौतिक सुविधा, विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम आणि विद्यार्थ्यांची जडणघडण आदी मुद्यांवर विद्याविषयक लेखापरीक्षण केले जाते. त्यासाठी ५०० गुण आहेत. परीक्षणासाठी महाविद्यालयांनी स्वयंमूल्यमापनाचा अर्ज ऑनलाईन भरायचा आहे. त्यानंतर दोन प्राचार्य आणि विद्यापीठ, महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयकांचा समावेश असलेल्या समितीकडून या स्वयंमूल्यमापनाची पडताळणी केली जाते.



या लेखापरीक्षणातून महाविद्यालयांना त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील स्थान समजणार आहे. उणिवा, बलस्थाने कळणार असून, ते त्यांना प्रगतीसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. पारंपरिक, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे लेखापरीक्षण करण्यात येत आहे. सर्व महाविद्यालयांच्या परीक्षणाचा एकत्रित अहवाल विद्या परिषदेला सादर केला जाईल.

- **व्ही. एस. सोयम**, उपकुलसचिव (संलग्नता विभाग), शिवाजी विद्यापीठ

### प्रशिक्षणासाठी कार्यशाळा

- महाविद्यालयांना या लेखापरीक्षणाबाबत प्रशिक्षण देण्यासाठी कमला कॉलेज (कोल्हापूर), मथूबाई गरवारे कन्या महाविद्यालय (सांगली), सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय (सातारा) येथे विद्यापीठातर्फे कार्यशाळा घेतली.
- त्यात प्राचार्य, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक, विद्याविषयक लेखापरीक्षणाचे काम पाहणारे कर्मचारी, असे ६४९ जण सहभागी झाले. त्यांना डॉ. पी. एन. चौगुले, आर. आर. कुंभार, योजना जुगळे, एस. आर. पाटील, राजेंद्र कुरळपकर यांनी मार्गदर्शन केले.

महासत्ता एकच आवृत्ती
02 APR 2022

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य परिपूर्ण

## डॉ.श्रीपाल सबनीस

कोल्हापूर,ता.२(प्रतिनिधी)-

अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य विश्वात्मक जाणीवांनी समृद्ध आणि परिपूर्ण आहे. त्या दृष्टीने त्यांच्या साहित्याचे मूल्य समाजासमोर ठेवणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ.श्रीपाल सबनीस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि अण्णा भाऊ साठे अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने अण्णा भाऊ साठे यांच्या लेखनाचे पैलू या डॉ. लक्ष्मण साठे लिखित ग्रंथाचे प्रकाशन आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार अशा संयुक्त कार्यक्रमात ते बोलत होते. वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते, तर प्रभारी कुलसचिव डॉ.व्ही.एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ.शिर्के,प्रभारी कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे, लक्ष्मण साठे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले तर राजेश पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# राज्यपाल मंगळवारी कोल्हापूर दौऱ्यावर

कोल्हापूर : महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे मंगळवार, दि. ५ एप्रिल रोजी कोल्हापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. मंगळवार दि. ५ एप्रिल रोजी सकाळी १०:१५ वा. कोल्हापूर विमानतळ आगमन. १०:२० मोटारीने शासकीय विश्रामगृहाकडे, १०:५५वाजता शासकीय विश्रामगृह येथून महासैनिक दरबार हॉल बावडा, ११ वा. विश्वात्मक संत साहित्य संमेलन उद्घाटनास उपस्थिती. ११:४५ वा. शिवाजी विद्यापीठाकडे प्रयाण. दुपारी १२ वाजता विद्यापीठातील शाहू हॉल येथे आयोजित प्रेसिडेंट व चांन्सलर अवॉर्ड कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती.

सकाळ

# राज्यपाल भगतसिंह कोश्यारी मंगळवारी कोल्हापूर दौऱ्यावर

**कोल्हापूर, ता. १ :** कोल्हापुरात भरणाऱ्या पहिल्या विश्वात्मक संत साहित्य संमेलनाच्या उद्घाटनासाठी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे मंगळवारी (ता. ५) कोल्हापुरात येत आहेत.

त्यांच्या दौऱ्याचे नियोजन : मंगळवारी सकाळी सव्वादहाला विमानतळ येथे आगमन. १० वाजून ५५ मिनिटांनी विमानतळावरून मोटारीने शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण, अकराला महासैनिक दरबार हॉल येथे होणाऱ्या पहिल्या संत साहित्य संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थिती. दुपारी बाराला शिवाजी विद्यापीठातील शाहू हॉल येथे आयोजित प्रेसिडेंट व चॅन्सलर ॲवॉर्ड कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती. एकला विमानतळावरून हेलिकॉप्टरने मुंबईला रवाना.

02 APR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संजीवन अभियांत्रिकीचे दोन्ही संघ अजिंक्य

## लीड कॉलेज व्हॉलीबॉल स्पर्धा

स्थानिक

क्रीडा वृत्त



पन्हाळा : संजीवनच्या दोन्ही विजयी संघांसोबत प्राचार्य डॉ. मोहन वनरोट्टी, डॉ. रणजित इंगवले व मान्यवर.

आपटी, ता. १ : सोमवार पेठ, पन्हाळा येथील संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर शिवाजी विद्यापीठअंतर्गत झालेल्या लीड कॉलेज व्हॉलीबॉल स्पर्धेत संजीवन अभियांत्रिकी कॉलेजच्या मुलांच्या व मुलींच्या दोन्ही संघांनी प्रथम क्रमांक पटकावला. तसेच संजय घोडावत इंजिनिअरिंग कॉलेज, अतिग्रे येथे झालेल्या बुद्धिबळ स्पर्धेत मुलींच्या संघाने प्रथम तर मुलांच्या संघाने तिसरा क्रमांक पटकावला.

संजीवन येथे झालेल्या व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये मुलांचा अंतिम सामना संजीवन अभियांत्रिकी कॉलेजविरुद्ध तात्यासाहेब कोरे इंजिनिअरिंग कॉलेज वारणानगर यांच्यात झाला. या सामन्यात संजीवनच्या मुलांनी सरळ दोन सेट जिंकून प्रथम क्रमांक मिळवला. संजीवनच्या मुलींचा अंतिम सामनाही तात्यासाहेब कोरे इंजिनिअरिंग कॉलेज वारणानगर यांच्याबरोबर झाला. या सामन्यातही संजीवनच्या मुलींनी सरळ दोन सेट जिंकत प्रथम क्रमांक पटकावला.

बक्षीस वितरण संजीवन कॉलेजचे प्राचार्य डॉ. मोहन बी. वनरोट्टी, डॉ. रणजित इंगवले, प्रा. बकस कुरणे, नितीन बहादुरे यांच्या हस्ते झाला. पंच म्हणून अबीद मोकाशी, नूरमुहंमद नागरजी, जयंत कुलकर्णी, कपिल खोत, नितीन पाटील, संदीप पाटील यांनी काम पाहिले. संजीवन ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन पी. आर. भोसले, सहसचिव एन. आर. भोसले, सीईओ प्राची भोसले यांचे सहकार्य लाभले.